महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ५१

# महाराजा सयाजीराव
# आणि
# सहकार चळवळ

राहुल वनवे



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ५१

# महाराजा सयाजीराव आणि सहकार चळवळ

राहुल वनवे

महाराजा सयाजीराव
आणि सहकार चळवळ
इतिहास
राहुल वनवे
●
प्रकाशन क्रमांक - ७१
पहिली आवृत्ती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : राहुल वनवे,
चांदोली वसाहत, काखे
ता. पन्हाळा,
जि. कोल्हापूर - ४१६११४
मो. ९१७२०२४४४५
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : ५४ रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/ 101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/ 1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**

●●●



# महाराजा सयाजीराव
# आणि
# सहकार चळवळ

१९०४ च्या कायद्याने ब्रिटिश भारतात सहकाराची मुहूर्तमेढ रोवली गेली. विशेषत: ग्रामीण भारतातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांबरोबरच शेतकऱ्यांना, शेतमजुरांना नवसंजीवनी देणारा हा कायदा ठरला. परंतु हा कायदा केवळ ब्रिटिश भारतापुरता मर्यादित होता. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात भारत हा ब्रिटिश प्रांत व संस्थाने यामध्ये विभागला गेला होता. १९०४ चा सहकार कायदा ब्रिटिश प्रांतामध्ये लागू झाल्यानंतर संस्थानिकांनीदेखील हा कायदा आपल्या संस्थानांमध्ये लागू केला.

तत्कालीन भारतात एकूण ५६५ संस्थाने होती. त्यापैकी बडोदा, जम्मू-काश्मीर, ग्वाल्हेर, इंदोर, हैदराबाद, म्हैसूर, पदूकोट्टा, कोचीन आणि त्रावणकोर या फक्त ९ संस्थानांमध्ये स्वतंत्र सहकार खाते अस्तित्वात होते. या देशी संस्थानांनी खऱ्या अर्थाने सहकार चळवळीचे महत्त्व ओळखल्याचे दिसून येते. १९०५ साली ब्रिटिश भारत सरकारच्या धर्तीवर बडोद्यामध्ये सयाजीरावांनी सहकार कायदा मंजूर केला. परंतु त्या पूर्वीच १८८९ मध्ये प्रा. विठ्ठल

लक्ष्मण कवठेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ‘अन्योन्य सहकारी मंडळी’ या सहकारी तत्त्वावरील बँकेची स्थापना करण्यात आली. ही भारतातील दुसरी सहकारी बँक होती. यापूर्वी गोविंद बाबाजी यांच्या वसई असोसिएशनने १८६२ मध्ये सहकारी पतपेढीचा प्रयोग केला होता.

अरुण जोशींच्या मते, ही महाराष्ट्रातील किंबहुना हिंदुस्थानातील पहिली सहकारी पेढी असावी. १९०५ मध्ये संमत करण्यात आलेल्या सहकार कायद्याने बडोद्यामध्ये सहकाराच्या नव्या नांदीला सुरुवात झाली. याचे उदाहरण म्हणून महाराष्ट्रातील राजर्षी शाहू महाराजांच्या प्रगत कोल्हापूर संस्थांनाशी बडोद्याची तुलना केली तर या नांदीची व्याप्ती आपल्या लक्षात येईल. १९२०-२१ मध्ये कोल्हापूर संस्थानात ३७ सहकारी संस्था होत्या तर त्याचवर्षी बडोद्यातील सहकारी संस्थांची संख्या ५०९ इतकी होती. म्हणजेच कोल्हापूर संस्थानच्या १४ पट सहकारी संस्था बडोद्यात होत्या.

## बँक ऑफ बडोदा आणि बडोद्यातील सहकार चळवळ

बडोद्यातील सहकार चळवळीच्या विकासासाठी संस्थानातील विविध उद्योग व सहकारी संस्थांना आर्थिक पाठबळ पुरवणे अत्यावश्यक होते. सयाजीरावांनी १९०६ मध्ये अमेरिकन अर्थतज्ज्ञ व्हाईटनॅक यांची राज्याच्या औद्योगिक प्रगतीसंदर्भातील विषयांसाठीचे तज्ज्ञ सल्लागार म्हणून नेमणूक केली. भारतात आर्थिक सल्लागारपदी नियुक्त झालेले

व्हाईटनॅक हे पहिले अमेरिकन तज्ज्ञ सल्लागार होते. या काळात जुन्या पतपेढ्या बंद झाल्यामुळे स्थानिक उद्योगांना भांडवलाची कमतरता जाणवत होती. बडोदा सरकार राज्याचे सार्वजनिक व खासगी क्षेत्रातील बरेचसे भांडवल बँक ऑफ मुंबईमध्ये गुंतवत होते. ही बँक बडोदा संस्थानच्या अधिकार क्षेत्राबाहेर होती. या पार्श्वभूमीवर सरकारची सर्व गुंतवणूक बँक ऑफ मुंबईमध्ये गुंतवल्यामुळे होणारा तोटा टाळण्यासाठी बँक ऑफ बडोदाची स्थापना करण्याची सूचना व्हाईटनॅक यांनी केली.

बडोद्यातील औद्योगिक व शेती क्षेत्राच्या विकासासाठी आवश्यक भांडवली पाठबळ पुरवण्याच्या उद्देशाने व्हाईटनॅक यांच्या मार्गदर्शनाखाली ९ जुलै १९०८ रोजी बँक ऑफ बडोदाची स्थापना करण्यात आली. बडोदा बँकेच्या स्थापनेमागची स्वतःची भूमिका आणि बँकेकडून असणाऱ्या अपेक्षा स्पष्ट करताना बँकेच्या उद्‌घाटन समारंभात सयाजीराव म्हणतात, “स्वत: सहकारी तत्त्वावर चालून नवीन संस्थांनाही त्याच तत्त्वाचा वस्तुपाठ या बँकेने दिला पाहिजे आणि व्यापारविषयक व्यवहाराच्या आधुनिक पद्धती लोकांना शिकविण्याचे कामही या बँकेने सतत केले पाहिजे. मुंबईमध्ये स्वदेशी भांडवलावर नुकत्याच स्थापना झालेल्या दोन बँकांनी जे संपूर्ण यश संपादन केले आहे. त्यावरून निर्विवाद सिद्ध झाले आहे की, कोणत्याही देशातील हुशार बुद्धिवंताशी हिंदी अर्थशास्त्रज्ञ

टक्कर देऊ शकतात. हिंदी लोकांतील काही जाती तर फार जुन्या काळापासून विविध सराफी व्यवहारांना एक उच्च कला म्हणून ओळखत आहेत.”

बडोद्यातील सहकार विकासाचा भांडवली पाया घालण्यात ‘बँक ऑफ बडोदा’ने मूलभूत भूमिका बजावली. बडोदा बँकेची स्थापना करताना दहा लाख रुपयांपैकी निम्मे पाच लाख रुपये भांडवल संस्था सभासदांच्या ठेवीतून उभा केले गेले, तर उर्वरित भांडवल सयाजीरावांनी संस्थानाकडून ठेवीच्या स्वरुपात बँकेला उपलब्ध करून दिले. संस्थानच्या या ठेवीमुळे बँकेची कर्जपुरवठ्याची क्षमता वाढली. परिणामी उद्योग उभा करण्यासाठी लागणारे भांडवल बडोदा बँकेकडून सहजपणे सवलतीत उपलब्ध होऊ लागले. बडोदा बँकेने आपले कार्यक्षेत्र संस्थानाबाहेर विस्तारले. बडोदा बँकेच्या एकूण पंधरा शाखांपैकी बॉम्बे, सुरत, अहमदाबाद आणि भावनगर या चार शाखा बडोद्याबाहेर होत्या.

बडोदा बँकेच्या सचोटीपूर्ण कारभारामुळे बँकेची आर्थिक स्थिती सातत्याने सुधारत गेली. १९२९ मध्ये बडोदा बँकेचे भाग भांडवल ३० लाख रु. पर्यंत पोहोचले तर बँकेचा राखीव निधी २३ लाख ५० हजार रु. होता. या मजबूत आर्थिक स्थितीच्या आधारे बडोदा बँकेकडून बडोद्यातील केंद्रीय सहकारी बँकेलादेखील आर्थिक मदत पुरविली जात होती. केंद्रीय सहकारी बँका बडोद्यातील विविध सहकारी संस्थांना अर्थसाहाय्य करत होत्या.

बडोदा संस्थानात बँक ऑफ बडोदाने सर्वप्रथम धनादेशाची सुविधा उपलब्ध करून दिली. त्याचप्रमाणे बँकेतील बचत खात्यांना प्रोत्साहन देवून जनतेमध्ये बचतीची सवय रुजवण्याचा प्रयत्न केला.

बडोदा सरकारकडून सातत्याने करण्यात आलेल्या आर्थिक मदतीच्या साहाय्याने बडोदा बँकेची प्रगती होत गेली. बँक ऑफ बडोदाने संस्थानातील परकीय व्यवसायांच्या नियमनात महत्त्वाची भूमिका बजावली. १९०८ मध्ये सयाजीरावांनी स्थापन केलेली ही भारतीय संस्थानातील पहिली सहकारी बँक आज ११२ वर्षानंतरही अत्यंत कार्यक्षमपणे कार्यरत आहे. समकालीन भारतातील 'स्टेट बँक ऑफ इंडिया'च्या नंतरची दुसऱ्या क्रमांकाची बँक म्हणून ती नावारूपास आली आहे. बँक ऑफ बडोदाची सद्य:स्थिती सयाजीरावांच्या आर्थिक व्यवस्थापनाच्या दूरदृष्टीची साक्ष देते.

## बडोदा संस्थानातील कृषी सहकार चळवळ

महाराजा सयाजीरावांनी बडोदा संस्थानात विविध प्रकारच्या कृषी संस्था स्थापन केल्या. यामध्ये शेतकऱ्यांना पतपुरवठा करणाऱ्या व बिगर पतपुरवठा संस्थांचा समावेश होता. कृषी पतपुरवठा संस्थांमार्फत शेतकऱ्यांना शेती व शेतीपूरक कामांसाठी आवश्यक पतपुरवठा अल्प व्याजदरात केला जात असे. दूध पुरवठा संस्था, पाणीपुरवठा संस्था, पशुखाद्य साठवणूक संस्था, धान्य साठवणूक संस्था इ. संस्था या बिगर

पतपुरवठा संस्था होत्या. या संस्थांमार्फत बडोदा संस्थानातील जनतेला प्रत्यक्ष पतपुरवठा केला जात नसे. मात्र कृषीविषयक इतर साधनांचा पुरवठा केला जात असे.

१९१५-१६ मध्ये २९५ कृषी पतपुरवठा संस्थांपैकी १२२ कृषी पतपुरवठा संस्था बडोदा जिल्ह्यात होत्या. इतर जिल्ह्यांच्या तुलनेत बडोदा जिल्ह्यामध्ये ही संख्या सर्वाधिक होती. नवसारी जिल्ह्यात संस्थांची संख्या सर्वात कमी म्हणजे ४७ इतकी होती. १९३८-३९ मध्ये तालुका विकास संघटनांसह कृषी संस्थांची संख्या ९९६ पर्यंत वाढली. प्रत्येक वर्षी वाढत जाणारी कृषी संस्थांची संख्या बडोदा राज्यातील कृषी व्यवस्था बळकट करणारी होती. सभासद संख्येतदेखील बडोद्यातील कृषी संस्था अग्रेसर होत्या. १९३८-३९ साली कृषी संस्थांची सभासद संख्या ३०,५०० पर्यंत पोहोचली. बडोद्यातील कृषक समाज सहकार चळवळीने व्यापून गेल्याचे या आकडेवारीवरून स्पष्ट होते. खेळत्या भांडवलातील वाढ सहकार चळवळीने बडोद्यातील शेतकऱ्याला इतर कोणत्याही संस्थानातील शेतकऱ्यांपेक्षा आर्थिकदृष्ट्या प्रबळ करण्यास केलेली मदत अधोरेखित करते.

## बडोदा संस्थानातील बिगर कृषी सहकार चळवळ

सयाजीराव महाराजांनी बडोदा संस्थानातील जी प्रजा शेती व शेतीपूरक व्यवसाय सोडून इतर व्यवसायात गुंतली आहे अशा लोकांना आर्थिक अडी-अडचणींवेळी आर्थिक साहाय्य करण्यासाठी बिगर कृषी पतपुरवठा संस्थांची निर्मिती केली.

यामध्ये प्रामुख्याने नागरी संस्था, विणकरांसाठी संस्था, सरकारी कर्मचाऱ्यांसाठी संस्था, चर्मकारांसाठी संस्था, अंत्योज्यांसाठी संस्था, शिक्षक सहकारी संस्था, रेल्वे कर्मचाऱ्यांसाठी संस्था इ. प्रकारच्या संस्था बडोदा संस्थानात महाराजांनी स्थापन केल्या. १९२२-२३ या वर्षात 'गायकवाड बडोदा राज्य रेल्वे कर्मचारी संस्था' या बिगर-कृषी संस्थेची नव्याने स्थापन करण्यात आली. तसेच मुस्लिमांसाठी काम करणारी 'मोहमेडन नागरी सहकारी संस्था' बडोदा शहरात कार्यरत होती.

१९२९-३० मध्ये सरार पाणीपुरवठा संस्था ग्रामीण भागातील लोकांना, जनावरांना आणि घरगुती वापरासाठी पाणीपुरवठा करीत होती. या संस्थेने ऑईल इंजिन खरेदी करून त्यामार्फत लोकांना पाणीपुरवठा करण्याचे नियोजन केले होते. १९३१-३२ या आर्थिक वर्षात बिगर कृषी संस्थांची संख्या १८४ इतकी झाली. यामध्ये १४ शहरी बँका, ५७ पूर निवारण संस्था, १३ नोकरदार संस्था, ४१ विणकरांच्या संस्था, ११ चर्मकार संस्था, ८ काटकसर संस्था, २१ सहकारी भांडारे, १ परस्पर सहकार्य संस्था, ५ गृहनिर्माण संस्था, ६ संस्था अस्पृश्य जातींशी संबंधित व ७ संस्था इतर वर्गाशी संबंधित होत्या.

## मध्यवर्ती सहकारी बँका आणि बँकिंग संघटना

१९१५-१६ मध्ये बडोदा संस्थानात २ नागरी बँका कार्यरत होत्या. या संस्थांपैकी एक संस्था बडोदा येथे तर दुसरी वसो या ठिकाणी होती. बडोदा येथील नागरी बँक छोटे व्यापारी, मोठे

व्यापारी व कारागीर वर्गाला पतपुरवठा करत होती. याच दरम्यान बडोदा मध्यवर्ती बँकेने धोरणात बदल करून आपले कार्यक्षेत्र बडोदा जिल्ह्यापुरते मर्यादित केले. या मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत सुमारे ९९ सहकारी संस्थांना पतपुरवठा केला गेला. यावरून मध्यवर्ती सहकारी बँकेचे महत्त्व अधोरेखित होते.

१९१५-१६ मध्ये नवसारी सहकारी बँकिंग संघटनाशी ३६ सहकारी संस्था संलग्न होत्या. तसेच कोडीनार या तालुक्यातील कोडीनार सहकारी बँकिंग संघटनेमार्फत सहकारी संस्थांना पूरक कार्य केले जात होते. मेहसाना येथील लोकसुद्धा मध्यवर्ती बँक सुरू करण्याबाबत उत्साही होते. सयाजीराव महाराज शिक्षणाच्या बाबतीत किती सजग होते याचा प्रत्यय आपणास या बँकिंग संघटनाच्या व्यवस्थापकाच्या निवडीतून येतो. कारण या बँकांचे व्यवस्थापक हे कृषी विषयात पदवी प्राप्त केलेले होते. कृषी बँकेमार्फत फक्त सहकारी संस्थांना कर्जपुरवठा न करता वैयक्तिक खातेदारांनाही कर्जपुरवठा करण्याचे धोरण बडोद्यातील सहकार चळवळीचा कमालीचा सकारात्मक दृष्टिकोन स्पष्ट करते.

बडोदा संस्थानात १९३८-३९ पर्यंतच्या कालखंडात संपूर्ण संस्थानातील सहकार चळवळीला अर्थ पुरवठा करण्याचे काम ८ प्रमुख पतपुरवठा संस्थांनी केले होते. जिल्हा स्तरावरील संस्था म्हणून बडोदा, मेहसाना व नवसारी जिल्हा सहकारी बँकांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. पेटलाड, कोडीनार व दामनगर

येथील बँकांनी तालुकास्तरीय पतपुरवठा संस्था म्हणून सहकारी संस्थांना मोठ्या प्रमाणावर पतपुरवठ्याचे काम केले.

बडोद्यातील मध्यवर्ती बँका आणि बँकिंग संघटनांनी सर्वसामान्य जनतेला आर्थिक साहाय्य करण्याची जबाबदारी पूर्ण क्षमतेने पार पाडण्याचा प्रयत्न केला. १९३७-३८ मध्ये या मध्यवर्ती बँका आणि बँकिंग संघटनांमध्ये सुमारे १५,३५,०८५ रु. चे खेळते भांडवल उपलब्ध होते. पुढील वर्षी १८३८-३९ मध्ये या रकमेत वाढ होऊन एकूण १६,९०,६५१ रु. चे खेळते भांडवल या बँकांमध्ये उपलब्ध झाले. या बँकाकडून त्यांच्याशी संलग्न सहकारी संस्थांना कर्जरूपाने पुरवलेली रक्कम १९३७-३८ मध्ये २,७८,९७९ रु. होती. पुढील वर्षी या रकमेत वाढ होऊन ३,३८,९२२ रु. एवढी रक्कम या बँकाकडून संलग्नित सहकारी संस्थांना उपलब्ध करून देण्यात आली.

## कापूस विक्री संस्था

१९२५-२६ मध्ये बडोद्यात ३ कापूस विक्री संस्थांची स्थापना करण्यात आली होती. यातील २ कापूस विक्री संस्थांकडून त्या वर्षी १,६५,५८० रुपयांच्या कापसाची विक्री करण्यात आली. व्यारा येथे कालीपरज लोकांसाठी स्वतंत्र सहकारी कापूस पुरवठा संस्थेची स्थापना केली. आदिवासींना सहकारी तत्त्वावर कापूस पुरवण्यासाठी स्थापन करण्यात आलेली भारतातील बहुधा ही पहिलीच संस्था असावी. या संस्थेमार्फत कालीपराज लोकांना १९२५-२६ या आर्थिक वर्षात ३,२२६ किमतीचे कापूस

बियाणे, गवारीचे बी- बियाणे आणि कपडे यांचे वितरण करण्यात आले. महाराजांनी आपल्या संस्थानातील सर्व घटकांच्या उन्नतीसाठी सर्वतोपरी प्रयत्न केल्याचे लक्षात येते.

१९३८-३९ दरम्यान बडोद्यात कापड उद्योग हा प्रमुख उद्योगांपैकी एक होता. त्यामुळेच संस्थानात १८ सहकारी कापूस विक्री संस्था कार्यरत होत्या. कापूस उत्पादकांच्या मालाला योग्य भाव मिळावा व त्याने उत्पादित केलेल्या कापसाची वेळेत विक्री व्हावी या दृष्टीने या कापूस विक्री संस्था फार महत्त्वाची भूमिका पार पाडत होत्या. कापूस विक्रीची जबाबदारी फक्त विक्री संस्थांवर पडू नये यासाठी सहकार खात्याने ग्रामीण भागातील संस्थांनासुद्धा कापूस विक्रीची जबाबदारी दिली.

## दुभत्या जनावरांच्या संस्था

१९२७-२८ मध्ये बडोदा संस्थानातील पाद्रा तालुक्यातील गावांमध्ये डेअरी व्यवसाय सुरू करण्याच्या हेतूने 'विशेष आर्थिक चौकशी समिती' नेमण्यात आली होती. समितीच्या अहवालानंतर या वर्षी संस्थानात अशा प्रकारच्या २७ संस्थांची नोंदणी करण्यात आली होती. या संस्थांना सरकारतर्फे दीर्घ मुदतीची कर्जे देण्याची हमी देण्यात आली. परिणामी बडोदा सरकारकडून दहा दुभत्या जनावरांच्या संस्थांना २३ हजार ७०० रुपयांच्या कर्जाचे वाटप करण्यात आले.

१९३८-३९ दरम्यान दूध उत्पादनाच्या दृष्टीने या संस्था महत्त्वपूर्ण भूमिका बजावत होत्या. सयाजीरावांनी केवळ दूध उत्पादनाकडे लक्ष न देता जनावरांच्या आरोग्याकडेही विशेष लक्ष दिले. बडोद्यात एकूण ११ दुभत्या जनावरांच्या संस्था होत्या. या विभागातील सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, सयाजीरावांनी दूध उत्पादनाबरोबरच उच्च जातीच्या जनावरांच्या प्रजननावरदेखील लक्ष दिले. यातूनच दोन पशुसंवर्धन संस्थांची स्थापना करण्यात आली होती.

## बडोदा संस्थानातील सहकारी कृषी बँका (पेढी)

बडोद्यात कार्यरत असणाऱ्या कृषी संस्थांना आर्थिक मदत उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने कृषी बँकांची स्थापना करण्यात आली. १९१७-१८ मध्ये अमरेली शेतकी बँक अमरेली जिल्ह्यातील कृषी सहकारी संस्थाना पतपुरवठा करीत होती. या कृषी बँकांच्या कामकाजावरील देखरेखीसाठी १९१८-१९ मध्ये बडोद्याच्या सहकार खात्याकडून १३ मानद आयोजकांची नेमणूक करण्यात आली होती. १९२२-२३ साली बडोदा संस्थानात भद्रन कृषी पेढी, रेल्वे कृषी पेढी, सोनगड कृषी पेढी, व्यारा कृषी पेढी या ४ कृषी बँका (पेढी) कार्यरत होत्या. या कृषी पेढ्यांमार्फत कृषी सहकारी संस्थांबरोबरच वैयक्तिक खातेदारांनादेखील पतपुरवठा केला जात होता.

१९३८-३९ या वर्षामध्ये भद्रण, अमरेली, व्यारा व सोनगढ या कृषी बँका उत्तम कामगिरीसह वाटचाल करत होत्या. या सर्व कृषी बँकांमध्ये अमरेली येथील बँकेने या वर्षात शेतकऱ्यांना उच्च प्रतीच्या बी-बियाणांचे वाटप करण्याचे धोरण ठेवले. या धोरणाच्या अनुषंगाने अमरेली बँकेकडून दोन हजार ४३९ मण शेंगदाणे, १३२८ मण कापूस बियाणे, १५० मण बाजरी, ११३ मण ज्वारी बियाणांच्या वाटपातून मोठ्या प्रमाणात शेतजमीन क्षेत्र पिकाखाली आले. अमरेलीसारख्या भागात शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला शेतमाल विक्रीसाठी एखादी बाजारपेठ असावी या उद्देशाने सयाजीरावांच्या निर्देशावरून अमरेली कृषी बँकेला अमरेली शेतमाल बाजारपेठ निर्माण करण्यासाठी प्रमाणित केले.

## भू-तारण बँक

स्वावलंबन, परस्पर साहाय्य आणि काटकसर या तत्त्वांना व्यवहारात आणणारी किंवा जनसामान्यांची आर्थिक, नैतिक, सामाजिक आणि राजकीय अशी विविध प्रकारची प्रगती साध्य करणारी बडोदा सहकारी भू-तारण बँक बडोदा येथे १९३३ मध्ये स्थापन करण्यात आली. स्थापना झाल्यानंतर लगेचच या बँकेने आपले कार्यक्षेत्र वाढवण्यास सुरुवात केली. पहिल्या टप्प्यात १९३५-३६ मध्ये या बँकेचे कार्यक्षेत्र सिन्नर, वाघोडिया आणि कर्जत इ. तालुक्यांपर्यंत वाढविण्यात आले.

१९३८-३९ मध्ये बडोदा जिल्ह्यातील दाभोई, कर्जत, सिन्नर, वाघोडिया, पाद्रा व सोनखेडा या तालुक्यांना भू-तारण बँकेच्या माध्यमातून सहकार्य करण्याचे धोरण सरकारने अवलंबिले होते. या वर्षी भू-तारण बँकेचे एकूण भांडवल १,११,०२३ रु. इतके झाले.

## सहकारी संस्थांचे वर्गीकरण

सहकारी संस्थांच्या होणाऱ्या गुणात्मक वाढीवरून त्या संस्थांच्या वर्गीकरणाचे धोरण सयाजीरावांनी १९२८ साली स्वीकारले. हे वर्गीकरण करत असताना 'अ', 'ब', 'क', 'ड' आणि 'इ' यातून सहकारी संस्थांमध्ये वर्षागणिक होणारा विकास समजत होता. असे वर्गीकरण केल्याने सर्वच संस्थांची स्थिती समजते. १९२८-२९ साली बडोदा संस्थानात ८३५ सहकारी संस्थांपैकी 'अ' आणि 'ब' वर्ग संस्थांची संख्या २४० होती. 'क' वर्ग संस्थांची संख्या ४८३ तर 'ड' आणि 'इ' वर्ग संस्थेची संख्या ११२ होती. कोणतीही संस्था केवळ नोंदणीकृत आहे म्हणून ती संस्था अनिश्चित काळासाठी सुरू ठेवण्यात येत नव्हती. वेळोवेळी प्रत्येक संस्थेची प्रगती बघून तिच्या नोंदणीसंदर्भात निर्णय घेतला जात होता. बडोद्यातील सहकार खात्याचे हे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य मानता येईल.

## सृजनशील बडोदा सहकार

सहकारी संस्थांचे विकेंद्रीकरण करताना महाराजांनी इतर संस्थानांच्या तुलनेत समाजातील प्रत्येक घटक सहकार चळवळीत कशाप्रकारे सामील होईल याचा बारकाईने विचार केला. त्यामुळेच सयाजीरावांना सहकारातील अनेक नावीन्यपूर्ण संस्थांची निर्मिती करता आली. विविध प्रकारच्या बहुतांश सहकारी संस्था सर्वप्रथम बडोदा संस्थानातच सुरू करण्यात आल्या असाव्यात. १९२७ साली बडोदा संस्थानात आलेल्या महापुरावेळी जनतेची प्रचंड वित्त हानी झाली होती. हे उदाहरण डोळ्यासमोर ठेवून महाराजांनी अशा पूर आपत्तीच्या वेळी बडोदा संस्थानातील प्रजेला सर्वांगीण मदत करण्यासाठी पूर निवारण संस्था सुरू केली. समाजातील मूलभूत प्रश्नांना सामोऱ्या जाणाऱ्या पुढील नमुनेदार संस्था म्हणजे सयाजीरावांच्या सृजनशील विचारांची समाजशिल्पेच आहेत.

## १) अन्योन्य सहकारी मंडळी

१९०४ मध्ये ब्रिटिश भारतात सहकार कायदा अमलात येण्यापूर्वी १५ वर्षे अगोदर १८८९ साली बडोद्यात प्रा. विठ्ठल लक्ष्मण कवठेकर यांनी 'अन्योन्य सहकारी मंडळी' ही संस्था स्थापन केली होती. प्रा. कवठेकर हे बडोद्यातील व्हर्नाक्युलर कॉलेज ऑफ सायन्स या पाठशाळेत शिकवत असत. त्यांनी १८९७ मध्ये अर्थशास्त्राची मूलतत्त्वे मराठीत मांडण्याचा पहिला प्रयत्न 'अर्थशास्त्र' या ग्रंथाद्वारे केला.

ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल शेतकऱ्यांना मदत करणे हा अन्योन्य साहाय्यकारी संस्थेचा मुख्य उद्देश होता. १९१५-१६ मध्ये अन्योन्य सहकारी मंडळीची सभासद संख्या १५८ वरून २०० वर पोहोचली. संस्थेचे खेळते भांडवल ३८,३९३ रु. वरून ४८,९०५ रु. पर्यंत वाढले. तर सभासदांच्या ठेवींची रक्कम ३४,२७२ रुपयांवरून वाढून ३८,७७५ रु. इतकी झाली.

## २) पूर निवारण संस्था

१९२७ मध्ये बडोदा संस्थानात आलेल्या महापुरात हानी झालेल्या जनतेच्या घरांची पुनर्बांधणी व इतर मदतीसाठी पूर निवारण संस्थेची सहकारी तत्त्वावर बडोदा शहरात सुरुवात करण्यात आली. अशा प्रकारची संपूर्ण भारतातील ही पहिली संस्था होती. बडोद्यात अशा ४० पूर निवारण संस्था कार्यरत होत्या. त्यापैकी २२ संस्था अस्पृश्य जातीबहुल भागात गृहनिर्माणाचे काम करत होत्या. या २२ संस्थांची सभासद संख्या ६३७ इतकी होती.

या संस्थांच्या आर्थिक मदतीसाठी १ लाख ६ हजार रुपयांच्या कर्जाची तरतूद करण्यात आली. अस्पृश्य जातींचे वास्तव्य बडोदा शहराच्या अत्यंत सखल भागात होते. अशा परिस्थितीत पुरामुळे त्यांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. या प्रदेशात गृहनिर्माणाच्या कामांना अधिक गती देण्यात आली. गृहनिर्माणाबरोबरच रस्ते व गटारे बांधकामाची कामे देखील मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात आली. पुरासारख्या नैसर्गिक

आपत्तीमुळे संकटात सापडलेल्या समाजाच्या शेवटच्या घटकांपर्यंत सयाजीरावांनी पूर निवारण संस्थांच्या माध्यमातून सर्वतोपरी मदत पोचवली.

## ३) सहकरी समाज सुधार संस्था

सामाजिक आणि धार्मिक सुधारणा घडवून आणण्यासाठी सयाजीरावांनी १९२९ मध्ये सहकारी तत्त्वावर समाज सुधार संस्थांची स्थापना केली. १९२९-३० मध्ये ३ समाज सुधार संस्था बडोदा संस्थानात कार्यरत होत्या. यापैकी उन्झा औडीच ब्राह्मण संस्था औडीच ब्राह्मण समाजासाठी कार्यरत होती. या संस्थेने आपल्या सामाजिक आणि धार्मिक कार्यक्रमांमध्ये कपात करून सुमारे ११ लाख ५२ हजार रुपयांची काटकसर केली. या काटकसरीतून सामाजिक सुधारणेसंदर्भात समाजात जागृतीचे काम हाती घेण्यात आले. ‘कडवा पाटीदार केलवानी मंडळ’ या समाज सुधार संस्थेनेदेखील या जागृतीच्या कार्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

## ४) भंगी सहकारी संस्था

सफाई कर्मचाऱ्यांना सहकार चळवळीमध्ये सामील करण्याच्या हेतूने १९३८ मध्ये सयाजीरावांनी भंगी सहकारी संस्थांची निर्मिती केली. बडोद्यातील १७ भंगी सहकारी संस्थांना सयाजीरावांकडून मोठ्या प्रमाणात आर्थिक सहकार्य करण्यात आले. या संस्थांचे बहुतांश सभासद हे नगरपालिकांचे सफाई

कर्मचारी होते. १९३८ मध्ये बडोद्यातील भंगी सहकारी संस्थांचे एकूण खेळते भांडवल ४५,८७२ रुपये व सभासद संख्या ६४१ होती. भंगी सहकारी संस्था सुरू करणारे भारतातील आजवरचे एकमेव प्रशासक असावेत. ही संस्था सुरू करून महाराजांनी सर्व समाज घटकांना समान दर्जा देऊन त्यांचा योग्य तो सन्मान केला असल्याचे स्पष्ट दिसते.

## ५) दुभत्या जनावरांसाठीच्या सहकारी संस्था

बडोद्यात १९२७-२८ मध्ये पाद्रा तालुक्यातील गावांमध्ये दुग्ध व्यवसाय सुरू करण्याच्या हेतूने 'विशेष आर्थिक चौकशी समिती' नेमण्यात आली होती. समितीच्या अहवालानंतर बडोदा संस्थानात २७ दुभत्या जनावरांसाठीच्या संस्थांची नोंदणी करण्यात आली.

या संस्थांना सरकारतर्फे दीर्घ मुदतीची कर्जाची हमी देण्यात आली. दीर्घकालीन कर्जपुरवठा धोरणानुसार १९२७-२८ मध्ये यातील दहा संस्थांना २३ हजार ७०० रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले. दुभत्या जनावरांसाठीच्या सहकारी संस्था आणि पशुसंवर्धन संस्थांना सातत्याने आर्थिक साहाय्य उपलब्ध करून देऊन सयाजीरावांनी बडोद्यातील दूध व्यवसायाच्या वाढीकडे जाणीवपूर्वक लक्ष पुरवले.

## ६) विखुरलेल्या शेतजमिनीचे एकत्रीकरण संस्था

प्रत्येक पिढीगणिक शेतकऱ्यांच्या मालकीच्या जमिनीचे विभाजन होऊन त्यांच्या शेतजमिनीचे क्षेत्रफळ कालपरत्वे कमी झाले होते. परिणामी म्हणून शेतीतून मिळणारे उत्पादनदेखील घटले होते. त्यामुळे शेतजमिनीचे उत्पादन वाढवण्यासाठी विभाजनामुळे विखुरलेल्या जमिनीचे एकत्रीकरण करणे आवश्यक होते. म्हणून शेतीच्या एकत्रीकरणातून उत्पादकता वाढवून त्याचा शेतकऱ्याला फायदा व्हावा या हेतूने एप्रिल ते डिसेंबर १९२७ मध्ये पाच विखुरलेल्या शेतजमिनीचे एकत्रीकरण करणाऱ्या संस्थांची निर्मिती सयाजीरावांनी केली.

१९३६-३७ मध्ये एकूण अशा ७४ संस्थांची नोंद झाली. या संस्थांच्या माध्यमातून या वर्षी ३८ सभासदांच्या ९८९.१२ बिघे जमिनीचे एकत्रीकरण करण्यात आले. या शेतजमीन एकत्रीकरणामुळे शेती करण्यास शेतकऱ्यांना सोयीस्कररीत्या हवे ते उत्पादन घेता येऊ लागले. १९३८-३९ अखेर बडोद्यात ७७ संस्थांची स्थापना केली गेली.

## ७) पॉवर पंप संस्था

शेतीस वेळेत व खंड न पडता पाणीपुरवठा व्हावा यासाठी १९२९ साली पॉवर पंप संस्थांची निर्मिती केली गेली. १९२९-३० मध्ये भुरकोई पॉवर पंप संस्थेने आपल्या सभासदांबरोबर इतर खातेदारांनादेखील या माध्यमातून पाणीपुरवठा केला. भुरकोई

येथील या संस्थेची कामगिरी इतर संस्थांच्या तुलनेत अधिक समाधानकारक होती. दरवर्षी या संस्थेच्या कामकाजात प्रगती होत गेली.

१९३८-३९ मध्ये पॉवर पंप संस्थांच्या माध्यमातून अधिकाधिक शेतजमीन ओलिताखाली यावी यासाठी बडोदा सरकारने या संस्थांना दिल्या जाणाऱ्या कर्जाच्या व्याजदरांमध्ये १.५ % घट करून हे व्याजदर ५% वरून ३.५% वर आणले. या आर्थिक वर्षात पॉवर पंप संस्थांच्या माध्यमातून सहकारी तत्त्वावर पाणीपुरवठ्याच्या माध्यमातून ४३७ बिघे जमीन ओलिताखाली आणली गेली.

## ८) सहकारी भांडारे

संस्थानातील जनतेला विविध वस्तूंचा वेळेत पुरवठा व्हावा यासाठी सयाजीरावांनी १९२९ पासून सहकारी तत्त्वावरील भांडारांची सुरुवात केली. १९२९-३० मध्ये बडोद्यात ग्रामीण व नागरी भागात एकूण २६ सहकारी भांडारे स्थापन करण्यात आली. परंतु त्यापैकी केवळ १० सहकारी भांडारे उत्तमरीत्या कार्यरत होती. या सहकारी संस्थांनी विविध प्रकारच्या ८६,४९७ रु. किमतीच्या वस्तूंची विक्री करून सुमारे ३,८९७ रु. नफा कमवला. ग्रामीण आणि नागरी भागातील सहकारी भांडारांप्रमाणेच इतर प्रकारची भांडारे लवकरच सुरू होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात

आली. परंतु ग्रामीण भागात या सहकारी भांडारांमध्ये काम करण्यासाठी प्रामाणिक व इच्छुक कामगारांची अनुपलब्धता हा यामधील सर्वात मोठा अडथळा होता.

## अ) ग्रामीण सहकारी भांडारे

बडोदा संस्थानातील ग्रामीण भागाचा सर्वांगीण शाश्वत आर्थिक विकास हे सयाजीरावांचे जीवनध्येय होते. सहकार चळवळीच्या माध्यमातून ग्रामीण भागाची प्रगती घडवून आणण्यासाठी १९३१ मध्ये सहकारी तत्त्वावरील ग्रामीण भांडारांची सुरुवात करण्यात आली.

## ब) नागरी भांडारे

ग्रामीण भांडाराबरोबरच शहरी जनतेला सहकारी तत्त्वावर विविध वस्तूंची खरेदी-विक्री करता यावी यासाठी १९३३ मध्ये बडोद्यातील शहरी भागात नागरी भांडारांची सुरुवात करण्यात आली. १९३३-३४ मध्ये बडोदा संस्थानातील शहरी भागात कार्यरत विविध नागरी भांडारांपैकी पुस्तकालय मंडळ, बडोदा किरकोळ वस्तू भांडार, ओखा पोर्ट भांडार आणि बडोदा दूध भांडार यांची प्रगती उल्लेखनीय होती. १९३८-३९ मध्ये पुस्तकालय मंडळाने ४२,२५९ रुपये किमतीची पुस्तक विक्री केली. पुस्तकालय मंडळीने सातत्यपूर्ण पुस्तक विक्रींच्या माध्यमातून बडोद्यातील ज्ञान चळवळीला मोलाचा हातभार लावला.

## क) विद्यार्थी भांडारे

विद्यार्थ्यांमध्ये सहकार चळवळीचे महत्त्व रुजावे या हेतूने १९३१ मध्ये सयाजीरावांनी सहकारी तत्त्वावरील विद्यार्थी भांडारांची निर्मिती केली. १९३१-३२ मध्ये बडोद्यात सुरू झालेल्या सहकारी तत्त्वावरील नोंदणीकृत विद्यार्थी भांडारांचे एकूण ७१६ विद्यार्थी सभासद होते. तर या वर्षी बडोद्यातील सहकार खात्याकडे नोंदणी नसणाऱ्या अनोंदणीकृत ११४ विद्यार्थी भांडारांची सभासद संख्या ६,०५३ इतकी होती. १९३७-३८ मध्ये २१ विद्यार्थी भांडारांनी ५,०६७ रुपये किमतीच्या वस्तूंची विक्री केली.

बडोद्यातील विद्यार्थी सहकारी भांडारांच्या वाटचालीचा विचार करता विद्यार्थ्यांनी चालवलेल्या या सहकारी संस्थांची संथगतीने परंतु सातत्यपूर्ण प्रगती झाल्याचे दिसते. शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांमध्ये सहकार चळवळीची मूल्ये रुजवण्याचा सयाजीरावांचा उद्देश या विद्यार्थी सहकारी भांडारांनी लक्षणीय प्रमाणात साध्य केला.

## ९) सहकारी गृहनिर्माण संस्था

बडोद्यातील सर्वसामान्य जनतेच्या राहत्या घरांचा प्रश्न कायमचा सोडवण्याच्या उद्देशाने सयाजीरावांनी १९३० मध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांची स्थापना केली. १९३०-३१ मध्ये बडोदा संस्थानात एकूण ४ गृहनिर्माण संस्थांची नोंदणी झाली होती. यापैकी सोजितरा आणि नवसारी येथे २

सहकारी गृहनिर्माण संस्था सर्वसामान्य जनतेसाठी सहकारी तत्त्वावर गृहनिर्माणाचे कार्य करत होत्या. सहकारी तत्त्वावरील घरनिर्मितीसाठी या संस्थांना योग्य दरात भूखंड उपलब्ध होणे ही या गृहनिर्माण संस्थांची प्राथमिक गरज होती. गृहनिर्मितीच्या कार्यासाठी भूखंड खरेदी करता यावी यासाठी बडोदा सरकारने या संस्थांना दीर्घकालीन कर्जपुरवठा योजना सुरू केली.

बडोद्यात कार्यरत असणाऱ्या या गृहनिर्माण संस्थांना बडोदा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून वित्त पुरवठा केला जात होता. १९३८-३९ मध्ये नवीन ३ सहकारी गृहनिर्माण संस्थांची नोंद करण्यात आली. गृहनिर्माण संस्थांचे शहरी व ग्रामीण भागात समप्रमाणात विकेंद्रीकरण होईल याची काळजी घेण्यात आली. त्यामुळेच बडोदा शहरात सहा गृहनिर्माण संस्था, नवसारी येथे दोन संस्था व कर्जत, महुवा, कोसंबा आणि कालोल येथे प्रत्येकी एक गृहनिर्माण संस्था गृहनिर्माणाचे काम करत होत्या. गृहनिर्माण संस्थांनी केलेल्या गुणवत्तापूर्ण कामामुळे बडोद्यातील सर्वसामान्य जनतेला स्वस्त दरात घरे मिळणे शक्य झाले हे या संस्थांचे यशच मानावे लागेल.

## १०) ग्रामीण पुनर्बांधणी आणि तालुका विकास संस्था

बडोद्यातील ग्रामीण भागाचा सरंचनात्मक उत्कर्ष घडवून आणण्याच्या उद्देशाने सयाजीरावांनी १९३३ मध्ये ग्रामीण पुनर्बांधणी संस्थांची स्थापना केली. या ग्रामीण पुनर्बांधणी

संस्था गाव पातळीवर कार्यरत होत्या. तर ग्रामीण पुनर्बांधणी संस्थांच्या कार्याचा तालुका पातळीवर समन्वय साधण्यासाठी तालुका विकास संस्थांची स्थापना करण्यात आली.

१९३८-३९ मध्ये ग्रामीण पुनर्बांधणी संस्थांची संख्या १२ पर्यंत पोहोचली. यावर्षी वाघोडिया, खेडूत आणि कालोल तालुका विकास संघटनांनी तालुका स्तरावर मूलभूत गरजांच्या पूर्तता करण्याबरोबरच विकास कामांचा सातत्याने पाठपुरावा केला.

ग्रामीण भागाच्या पुनर्बांधणीसाठी भारत आजही धडपडत आहे. भारत सरकारकडून त्यासाठी वेगवेगळे उपक्रम आणि योजना वर्षानुवर्षे राबवल्या जातात. परंतु सयाजीरावांनी १९३३ मध्ये ग्रामीण पुनर्बांधणीसाठी सहकारी तत्त्वावरील ग्रामीण पुनर्बांधणी संस्थांचा केलेला प्रयोग या दृष्टीने आजही पथदर्शी ठरतो.

## ११) स्त्रिया व पुरुषांच्या काटकसर (बचत गट) संस्था

काटकसर हे आर्थिक बदलाचे सूत्र मानून १९३१ साली महिलांच्या काटकसर संस्थांची निर्मिती सयाजीरावांनी केली. १९३१ मध्ये संपूर्ण बडोदा राज्यात ११ महिला काटकसर संस्था कार्यरत होत्या. यातील महिला सभासदांची संख्या २०५ व त्यांनी केलेली काटकसर ३,०६४ रुपये होती. जास्तीत जास्त महिलांना यामध्ये सहभागी करून घेण्याचा उद्देश काटकसर संस्था स्थापनेमागे होता. बांग्लादेशातील अर्थशास्त्रज्ञ आणि बचत गट

चळवळीच्या कामाची दखल घेऊन २००६ मध्ये ज्यांना नोबेल पुरस्कार दिला गेला त्या महंमद युनूस यांच्या अगोदर ५० वर्षे सयाजीरावांनी बडोद्यात हा यशस्वी प्रयोग केला होता. १९३८-३९ मध्ये ५५ महिला काटकसर संस्था अस्तित्वात होत्या.

१९३२-३३ दरम्यान बडोद्यात एकूण २८ काटकसर संस्था अस्तित्वात होत्या. यामध्ये १३ महिला काटकसर संस्था तर २ पुरुष काटकसर संस्था होत्या. बडोद्यातील २८ काटकसर संस्थांची एकत्रित सभासद संख्या २४१ इतकी होती. त्यापैकी फक्त १५ काटकसर संस्थाच पूर्ण कार्यक्षमतेने आपले काम करत होत्या. महिला काटकसर संस्थांच्या २६५ सभासदांनी या आर्थिक वर्षात एकूण ३,५३८ रुपयांची काटकसर केली.

राणीपरज आदिवासी क्षेत्रातील महिलांना काटकसरीची सवय लागून या माध्यमातून आदिवासी महिलांना उन्नती साधता यावी यासाठी राणीपरज आदिवासी क्षेत्रात १९३६-३७ या वर्षाच्या सुरुवातीस २४ महिला काटकसर संस्था कार्यरत होत्या. १९३८-३९ मध्ये या भागातील बंद पडलेल्या संस्थांच्या जागी तितक्याच नवीन संस्थांची नोंदणी करण्यात आली. आदिवासी क्षेत्रातील आर्थिक नियोजनाकडे सयाजीरावांचे बारकाईने असणारे लक्ष यातून व्यक्त होते. आदिवासी क्षेत्रात कार्यरत महिला आणि पुरुष काटकसर संस्थांची एकत्रित सभासद संख्या ७३१ इतकी होती. या संस्थांकडे एकूण ११,९२६ रुपयांचे खेळते भांडवल उपलब्ध होते. तर या संस्थेच्या सभासदांनी सुमारे ११,३३९ रु.ची बचत

केली. १९३८-३९ मध्ये ५५ महिला काटकसर संस्था अस्तित्वात होत्या. सयाजीरावांनी महिलांबरोबरच पुरुष काटकसर संस्थांची निर्मिती करून भारताला स्त्री-पुरुष समानतेचा अनोखा आदर्श घालून दिला.

## १२) सहकारी चारा पुरवठा संस्था

सयाजीरावांना आपल्या जनतेबरोबरच संस्थानातील जनावरांची विशेष काळजी होती. दुष्काळी काळात किंवा पूर संकटात शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारच्या चारा संकटाला तोंड द्यावे लागू नये यासाठी सयाजीरावांनी १९२३-२४ मध्ये ३६ पशुखाद्य साठवणूक सहकारी संस्थांची निर्मिती केली. या संस्थांचे वेगळेपण म्हणजे यामध्ये वाळलेल्या चाऱ्याबरोबरच ओल्या चाऱ्याचीदेखील साठवणूक करण्याची व्यवस्था केली होती. या संस्थेबरोबरच संकट काळात जनतेला धान्याची कमतरता पडू नये यासाठी ११ सहकारी धान्य साठवणूक संस्थांची निर्मिती केली.

## बडोद्यातील सहकार साक्षरता

सयाजीराव महाराजांच्या समाजविकास योजनांमध्ये शिक्षण आणि प्रशिक्षण या बाबींना अनन्यसाधारण महत्त्व होते. सहकार चळवळही याला अपवाद नव्हती. सहकार चळवळीची रुजवणूक लोकांमध्ये व्हावी म्हणून १९१४ पासून बडोद्यात सहकार साक्षरतेची मोहीम राबविण्यास सुरुवात झाली. लोकांना

सहकार चळवळीच्या मूलतत्त्वांची मातृभाषेत माहिती व्हावी यासाठी सयाजीरावांनी जगभरातल्या सहकारावरील महत्त्वपूर्ण ग्रंथांचे गुजराथी भाषेत भाषांतर करून घेतले. १९२४ मध्ये 'सहकार अने राष्ट्रीय जीवन', १९३० मध्ये 'ग्रामजीवनमा सहकार्य' तर १९३२ मध्ये सहकारमीमांसा, अर्थशास्त्र या पुस्तकांचा यामध्ये समावेश होता. सयाजीरावांनी सहकार खात्यातील अधिकारी व कर्मचारी वर्गासाठी आणि सहकार चळवळीची आवड असणाऱ्या लोकांसाठी सहकार परिषदा व प्रशिक्षणवर्गांचे आयोजनदेखील केले होते.

१९१४ साली बडोदा शहरात पहिल्या सहकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. १९१५-१६ मध्ये दोन जिल्हास्तरीय तर ४ तालुकास्तरीय सहकार परिषदांचे आयोजन करण्यात आले होते. यातील २ जिल्हास्तरीय परिषदा बडोदा जिल्ह्यासाठी पाद्रा व कडी जिल्ह्यासाठी मेहसाना येथे आयोजित करण्यात आल्या. या परिषदांच्या अध्यक्षस्थानी प्रतिष्ठित व्यक्तींची नेमणूक करण्यात आली होती. पाद्रा येथील परिषदेचे अध्यक्ष नायब दिवाण श्रीमंत गणपतराव गायकवाड हे होते, तर मेहसाना येथील परिषदेचे अध्यक्षपद श्रीमंत संपतराव गायकवाड (सुभा) यांनी भूषवले. मियागम, संधाली, अमरेली आणि कोडीनार या ठिकाणी तालुकास्तरीय परिषदा आयोजित केल्या होत्या. १९१५-१६ पासून कृषी त्रैमासिकाच्या संपादनाचे काम कृषी खात्याकडून काढून सहकार खात्याकडे देण्यात

आले व त्याच्या नावात बदल करून त्याचे नामकरण ‘कृषी व सहकार’ असे करण्यात आले. हा सयाजीरावांच्या समन्वयवादी धोरणाचा परिणाम होता. महाराष्ट्रात स्वातंत्र्यानंतर क्रांतिकारक ठरलेल्या सहकार चळवळीची व कृषी-औद्योगिक धोरणाची पायाभरणी सयाजीराव महाराजांनी बडोद्यात केली होती हे दुर्दैवाने महाराष्ट्राला अज्ञात आहे.

१९१७-१८ मध्ये सहकारी संस्थांमधील पदाधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याबाबत सयाजीरावांनी सहकार खात्याला आदेश दिले. या आदेशाचे पालन करत सहकार खात्याने मेहसाना व अमरेली या ठिकाणी दोन प्रशिक्षणवर्गाचे आयोजन ऑक्टोबर व मे महिन्यात केले. या प्रशिक्षणवर्गात सर्व सहकारी संस्थांमधील सचिव, मानद आयोजक, तजवीजदार, पेढीचे मुनीम सहभागी झाले होते. या प्रशिक्षणवर्गाचे आयोजन व सहभागींना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी सहकार खात्याचे निबंधक श्री.पगार आणि श्री. अधिकारी यांनी पार पाडली.

सयाजीरावांनी सहकार चळवळीबाबतची ध्येयधोरणे जनसामान्यांपर्यंत पोहोचावीत यासाठी सहकार खात्याचे अधिकृत मुखपत्र ‘ग्रामजीवन’ सुरू करण्यात आले होते. या मुखपत्राच्या माध्यमातून सहकार खात्याचे निर्णय व सहकार विषयक माहिती लोकांपर्यंत पोहोचवली जात होती. ‘ग्रामजीवन’ बरोबरच ‘शेती आणि सहकार्य’ या त्रैमासिकातून सहकाराची माहिती प्रसारित करण्यात आली. या मासिकाच्या प्रभावामुळे

सहकार चळवळीमध्ये काम करण्याची इच्छा असलेले नागरिक याकडे आकर्षित झाले.

१९२३-२४ मध्ये बडोदा व नवसारी जिल्ह्यातील संस्थांच्या सचिवांसाठी आणि सहकारी संस्थांच्या कामात प्रत्यक्ष रस घेणाऱ्यांना बडोद्यातील 'सचिव सहकारी प्रशिक्षणवर्गात' सरकारने सहकारविषयक प्रशिक्षण देण्याचे काम सुरू केले. २५ लोकांनी या प्रशिक्षणवर्गात उपस्थिती दर्शवली. या वर्गाच्या शेवटी परीक्षा घेऊन उत्तीर्ण परीक्षार्थींना प्रमाणपत्रे देण्यात आली.

१९२७-२८ व्या वर्षात सहकार खात्याने शेतकऱ्यांना शेती संदर्भातील विविध विषयावरची वेळेत माहिती देण्यासाठी 'कृषी दिनदर्शिके'चे प्रकाशन केले. कृषी दिनदर्शिका प्रकाशित करण्याचा हा ब्रिटिश भारतातील पहिलाच प्रयोग असावा. बडोदा राज्यातील सहकार चळवळीमध्ये प्रत्येक वर्षागणिक चांगल्या प्रकारे वाढ होत होती. सहकारासंदर्भातील नवनवीन संस्थांची भर पडत गेली. त्यामुळे सहकार चळवळ जनसामान्यात खोलवर रुजली.

## मध्यवर्ती सहकारी प्रशिक्षण संस्था

बडोदा संस्थानात मध्यवर्ती सहकारी प्रशिक्षण संस्थेची स्थापना १९२३ मध्ये करण्यात आली. संस्थानात सहकार चळवळीचा प्रचार-प्रसार करणे, सहकारासंदर्भातील विषयांच्या अभ्यासाला उत्तेजन देणे, सहकार परिषदा व प्रशिक्षणवर्गांचे

आयोजन करणे ही कामे या संस्थेमार्फत केली जात होती. १९२६ साली महाराजांच्या राज्यारोहण सुवर्ण महोत्सवानिमित्त या संस्थेचे नामकरण 'श्री सयाजी सहकार सेवा संघ' करण्यात आले. १९२७-२८ साली या संस्थेची सभासद संख्या ४७४ व मिळकत ४,३०८ रुपये होती. या संस्थेमार्फत ३ सहकार परिषदांचे आयोजन सिद्धापूर, विहार आणि अमरेली या ठिकाणी करण्यात आले होते.

मध्यवर्ती सहकारी प्रशिक्षण संस्थेच्या सभासद संख्येत १९३८-३९ मध्ये घट होऊन ८९४ वरून ८११ पर्यंत कमी झाली. मात्र या सभासद संख्या घटीचा कोणताही परिणाम संस्थेच्या कामकाजावर झाला नाही. मध्यवर्ती सहकारी संस्थेला संस्था सभासद आणि वैयक्तिक लोकांचे मिळून सुमारे १,६५९ रुपये शुल्क प्राप्त झाले. या संस्थेकडून दीर्घकाळापासून सहकार प्रशिक्षणाचे कार्य सुरू होते. या अंतर्गतच सयाजीरावांच्या आदेशावरून ३ जिल्हास्तरीय सहकार प्रशिक्षणवर्गाचे आयोजन केले गेले. या प्रशिक्षण वर्गामध्ये सहकाराचे कामकाज कसे चालते याचे प्रशिक्षण सहकारी संस्थांच्या सचिवांना दिले गेले. सहकार चळवळीचे महत्त्व गावोगावच्या लोकांना माहिती व्हावे यासाठी सयाजीरावांनी मध्यवर्ती सहकारी संस्थेच्या कर्मचाऱ्यांना सहकारावर व्याख्याने द्यायला प्रोत्साहित केले.

## उर्वरित भारत आणि बडोद्यातील सहकार : तुलनात्मक आकलन

स्वातंत्र्यपूर्व भारतात एकूण ५६५ संस्थाने अस्तित्वात होती. यापैकी जम्मू-काश्मीर, बडोदा, ग्वाल्हेर, इंदूर, हैदराबाद, म्हैसूर, पुदुकोट्टा, कोचीन आणि त्रावणकोर या केवळ ९ संस्थानांमध्ये स्वतंत्र सहकार खाते अस्तित्वात होते. स्वतंत्र सहकार खात्याच्या माध्यमातून या संस्थानांनी आपल्या संस्थानातील सहकार चळवळीचा विकास साधण्याचा प्रयत्न केला. या संस्थानांपैकी जम्मू-काश्मीरमध्ये सहकार खाते कृषी खात्याशी संलग्न होते. तर इंदूर संस्थानात ग्रामविकास खात्यांतर्गत एक विभाग म्हणून सहकार खाते कार्यरत होते. या ९ संस्थानातील सहकार खात्याच्या कार्याच्या गुणवत्तेचा अभ्यास जी.आर.पिलाई यांनी १९३३ मध्ये त्यांच्या 'Cooperation in Indian States' या ग्रंथात पुढीलप्रमाणे गटवार वर्गीकरण केले आहे.

१) म्हैसूर व बडोदा
२) त्रावणकोर, कोचीन व पुदुकोट्टा
३) जम्मू-काश्मीर
४) हैदराबाद
५) इंदूर व ग्वाल्हेर

जी. आर. पिलाई यांनी केलेल्या वर्गीकरणानुसार म्हैसूर व बडोदा संस्थानातील सहकार खात्यांचे कार्य अत्यंत उत्कृष्टपणे चालू होते. स्वतंत्र सहकार खाते अस्तित्वात असलेल्या या

संस्थानांबरोबरच मुंबई व मद्रास हे दोन प्रांतदेखील त्यांच्या कार्यक्षेत्रातील सहकार चळवळीच्या विकासासाठी नावाजले जात होते. ब्रिटिश भारतातील विविध प्रांत व संस्थानांच्या सहकारविषयक कार्याचे मूल्यमापन त्यांच्या प्रदेशातील सहकारी संस्थांची स्थिती आणि सहकारविषयक ज्ञानप्रसारासाठी त्यांनी केलेले प्रयत्न अशा दोन प्रमुख निकषांवर करणे गरजेचे ठरते.

## भारतातील विविध प्रांत व संस्थानांतील सहकारी संस्था आणि सभासद संख्या

भारतातील मुंबई आणि मद्रास प्रांत आणि बडोदा, म्हैसूर, कोचीन व त्रावणकोर संस्थानांतील १९३१-३२ मधील सहकारी संस्थांच्या संख्यात्मक वाटचालीची तुलना केली असता पुढील बाबी लक्षात येतात.

त्रावणकोर संस्थानात ५१ लाख लोकसंख्येसाठी १,८१८ सहकारी संस्था काम करत होत्या. त्रावणकोरच्या १० हजार लोकसंख्येमागे सुमारे ३६ सहकारी संस्था अस्तित्वात होत्या. १२ लाख इतकी तुलनेने सर्वात कमी लोकसंख्या असलेल्या कोचीन संस्थानात २४६ सहकारी संस्थांचे जाळे पसरले होते. तर १० हजार लोकसंख्येमागील सहकारी संस्थांचे प्रमाण केवळ २० सहकारी संस्था इतके होते. या पार्श्वभूमीवर २४ लाख लोकसंख्या असलेल्या बडोदा संस्थानात १० हजार लोकसंख्येमागे सर्वाधिक ४३ सहकारी संस्था कार्यरत होत्या. बडोद्यात यावर्षी एकूण १,०६३ सहकारी संस्था अस्तित्वात होत्या.

लोकसंख्येचा विचार करता बडोदा संस्थानातील १० हजार लोकसंख्येमागील सहकारी संस्थांची घनता इतर सर्व संस्थानांपेक्षा अधिक होती. यामुळे संस्थानातील अधिकाधिक जनतेला सहकारी संस्थांची सुविधा उपलब्ध होणे शक्य झाले. तर १००० लोकसंख्येमागील सर्वाधिक प्राथमिक सहकारी संस्था सभासद त्रावणकोर संस्थानामध्ये होते. त्रावणकोर संस्थानाची एकूण लोकसंख्या विचारात घेता प्राथमिक सहकारी संस्थांची सभासद संख्या वाढणे क्रमप्राप्त होते.

## भारतातील विविध प्रांत व संस्थानांतील प्राथमिक सहकारी संस्थेमागील लोकसंख्या दर

१२ लाख लोकसंखेच्या कोचीन संस्थानातील प्राथमिक सहकारी संस्थांची संख्या केवळ २४६ इतकी होती. त्यामुळे कोचीनमध्ये सर्वाधिक ४,८७८ व्यक्तींमागे एक प्राथमिक सहकारी संस्था कार्यरत होती. बडोदा संस्थानात याच कालावधीत १,०६३ प्राथमिक सहकारी संस्था अस्तित्वात होत्या. २४ लाख लोकसंख्येच्या बडोदा संस्थानात २,२५७ व्यक्तींमागे एक प्राथमिक सहकारी संस्था होती. एका संस्थेवर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींची संख्या इतर सर्व संस्थानापेक्षा बडोद्यात सर्वात कमी होती. बडोदा संस्थानातील लोकसंख्येच्या तुलनेत प्राथमिक संस्थांचा झालेला संतुलित विकास वरील आकडेवारी अधोरेखित करते. २०२० च्या महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणी अहवालानुसार २०१८-१९ मध्ये महाराष्ट्रात ५,४१६

व्यक्तींमागे एक प्राथमिक सहकारी संस्था अस्तित्वात होती. यावरून सयाजीरावांनी तत्कालीन बडोद्यात साधलेला सहकार चळवळीच्या विकासाचा टप्पा गाठणे सहकार चळवळीची पंढरी असणाऱ्या महाराष्ट्राला आजही जमले नसल्याचे स्पष्ट होते.

## भारतातील विविध प्रांत व संस्थानांतील सहकारी कृषी संस्थांची संख्या

कृषी सहकारी संस्थांच्या सभासद संख्येचा विचार करता मद्रास प्रांतात सर्वाधिक ६,७५,००० इतके कृषी सहकारी संस्थांचे सभासद होते. मद्रासमधील एका कृषी संस्थेची सरासरी सभासद संख्या ५४ इतकी होती. त्याखालोखाल अनुक्रमे ३,२२,००० व १,६५,००० सभासद संख्या असणाऱ्या मुंबई प्रांत व त्रावणकोर संस्थानात एका कृषी सहकारी संस्थेची सरासरी सभासद संख्या अनुक्रमे ६७ व ११७ इतकी होती. कृषी सहकारी संस्थांचे ७२ हजार सभासद असणाऱ्या म्हैसूर संस्थानात हे प्रमाण प्रत्येक कृषी सहकारी संस्थेमागे ४१ सभासद इतके होते. तर सर्वात कमी १२,००० सभासद संख्या असणाऱ्या कोचीन संस्थानात ८६ सभासदांमागे एक कृषी सहकारी संस्था होती. या पार्श्वभूमीवर २८ सभासदांमागे एक कृषी सहकारी संस्था अस्तित्वात असणाऱ्या बडोदा संस्थानात कृषी सहकारी संस्थांचे जाळे सर्वसामान्य शेतकरी वर्गापर्यंत पोहोचल्याचे दिसून येते.

## भारतातील विविध प्रांत व संस्थानांतील सहकारी संस्थांची आर्थिक स्थिती

बडोदा संस्थानातील सहकारी संस्थांना ५,४१,००० रु. इतके शासकीय कर्ज देण्यात आले होते. या सहकारी संस्थांच्या उभारणीतील बडोदा सरकारचे धोरणात्मक आर्थिक पाठबळ यातून अधोरेखित होते. याचबरोबर बडोद्यातील सहकारी संस्थेच्या प्रत्येक सभासदामागील खेळते भांडवल मुंबई प्रांतानंतर सर्वाधिक १२७ रुपये प्रतिसभासद इतके होते. सहकारी संस्थांच्या माध्यमातून प्रत्येक सभासदाला पुरवल्या गेलेल्या आर्थिक पाठबळाचे हे निदर्शक आहे. त्रावणकोर व कोचीन या तत्कालीन प्रगत संस्थानांमध्ये सहकारी संस्थांच्या प्रत्येक सभासदामागील उपलब्ध खेळत्या भांडवलाचे प्रमाण अनुक्रमे २७ रु. व ५५ रु. इतके कमी होते. ही आकडेवारी १९३१-३२ मध्ये बडोदा संस्थानातील सहकारी संस्थांच्या माध्यमातून सभासदांना प्रदान केली गेलेली आर्थिक सक्षमता स्पष्ट करते.

## भारतातील विविध प्रांत व संस्थानांतील कर्जपुरवठा

१९३१ मध्ये म्हैसूर संस्थानात शासनाकडून सहकारी संस्थांना एकूण २,७४,८३१ रु. चे आर्थिक साहाय्य करण्यात आले. संस्थानातील कृषी आणि बिगरकृषी सहकारी संस्थांना पुरवण्यात आलेल्या अनुक्रमे १,२६,५६३ रु. व १,१७,१४५ रु. मदतीचा

यात समावेश होता. हैदराबाद संस्थानात १९३१ मध्ये एकूण २८ केंद्रीय बँका कार्यरत होत्या. या २८ केंद्रीय बँकांपैकी १० केंद्रीय बँकांना शासनाकडून २,०६,८९८ रु. आर्थिक साहाय्य करण्यात आले, तर कृषी आणि बिगर कृषी संस्थांना अनुक्रमे ४६,१६७ रु. व ८२,१५० रु. शासनाकडून पुरवण्यात आले.

१९३१ मध्ये बडोदा संस्थानातील सहकारी संस्थांचे एकूण खेळते भांडवल ६८,३२,२२६ रु. होते. बडोदा शासनाकडून सहकारी संस्थांना ७,३८,२०८ रु.चे आर्थिक साहाय्य कर्जरूपाने उपलब्ध करून देण्यात आले. बडोदा सरकारकडून देण्यात आलेले आर्थिक साहाय्य सहकारी संस्थांच्या एकूण खेळत्या भांडवलाच्या ९.२६% होते. शासनाच्या आर्थिक साहाय्याचे बडोद्यातील प्रमाण इतर संस्थानांच्या तुलनेत सर्वाधिक होते. संस्थानच्या आर्थिक विकासातील सहकार चळवळीचे महत्त्व ओळखून बडोदा सरकारने सहकारी संस्थांच्या उभारणीत सक्रिय सहभाग घेतला. सहकार संस्थांच्या उभारणीसाठी केवळ सर्वसामान्य जनतेवर अथवा संस्था सभासदांवर अवलंबून न राहता शासनाने घेतलेला पुढाकार इतर संस्थानांच्या तुलनेत बडोद्यातील सहकार चळवळीचे वेगळेपण आणि सयाजीरावांची आपल्या प्रजेच्या कल्याणाची तळमळ यावर शिक्कामोर्तब करतो.

## भारतातील विविध प्रांत व संस्थानांतील सहकारी संस्थांच्या कर्जाचे व्याजदर

ब्रिटिश भारतातील विविध संस्थानात स्थापन झालेल्या सहकारी संस्थांचा प्रमुख उद्देश संस्था सभासदांना पतपुरवठा हा होता. सभासदांना कर्जरूपाने पतपुरवठा करणाऱ्या या विविध प्रकारच्या सहकारी संस्था आर्थिक साहाय्यासाठी त्या-त्या संस्थानातील केंद्रीय बँकांवर अवलंबून होत्या. जम्मू-काश्मीरमध्ये केंद्रीय बँकेकडून ९% व्याजदराने सहकारी संस्थांना कर्ज उपलब्ध करून दिले जात होते. तर सहकारी संस्थांकडून संस्था सभासदांना पुरवण्यात येणाऱ्या कर्जाचा व्याजदर १२.५% इतका होता. म्हैसूर संस्थानात सहकारी संस्थांना ३ ते ७% व्याजदराने केंद्रीय बँकांकडून कर्जपुरवठा केला जात होता. तर सहकारी संस्था सभासदांना दिलेल्या कर्जावर ९ ते १२% व्याज आकारत होत्या.

बडोद्यातील केंद्रीय बँका मर्यादित उत्तरदायित्व बिगरकृषी पतपुरवठा संस्थांना ४.५ ते ६% व्याजाने अर्थसाहाय्य पुरवत होत्या. तर या सहकारी संस्था केवळ १.५ % अधिक व्याजदर आकारून सभासदांना कर्ज देत होत्या. अमर्यादित उत्तरदायित्व बिगर कृषी पतपुरवठा संस्थांसुद्धा केंद्रीय बँकेपेक्षा केवळ १.२५ % अधिक व्याजदराने सभासदांना अर्थसाहाय्य पुरवत होत्या. ब्रिटिश भारतातील इतर संस्थानांच्या तुलनेत बडोद्यात सहकारी संस्थांकडून आकारला जाणारा व्याजदर कमी होता.

## भारतातील विविध प्रांत व संस्थानांतील सहकारविषयक साहित्य प्रकाशन

मुंबई प्रांतात काही अशासकीय व्यक्तींनी एकत्र येऊन ‘मुंबई मध्यवर्ती सहकारी संस्थे’ची स्थापना केली. मद्रासमध्ये ‘मद्रास प्रांत सहकार संघटना’ प्रामुख्याने सहकारविषयक शिक्षण प्रसाराचे काम करत होती. बंगालमध्ये सहकार चळवळीचा प्रसार करण्याच्या उद्देशाने ‘बंगाल सहकारी सोसायटी’ या संस्थेची स्थापना करण्यात आली. बडोदा संस्थानात सहकार चळवळ विषयक ज्ञानप्रसाराचे कार्य मुख्यत: शासकीय सहकार खात्याकडून केले जात असे. सहकार खात्यातील अधिकाऱ्यांच्या साहाय्याने ‘ग्रामजीवन’ नावाचे सहकार खात्याचे मुखपत्र असणारे त्रैमासिक नियमितपणे प्रकाशित होई. हे त्रैमासिक मराठी व गुजराथी अशा दोन्ही भाषेत निघत असे.

या त्रैमासिकामध्ये सहकार चळवळीबरोबरच ग्रामीण पुनर्निर्माणाशी संबंधित या विषयांचा ऊहापोह केला जात होता. १९२७-२८ मध्ये सहकार खात्याकडून ‘शेती व सहकार्य’ त्रैमासिकाचे प्रकाशन सुरू करण्यात आले. हे त्रैमासिक गुजराथी भाषेत प्रकाशित होत असे. या त्रैमासिकाच्या माध्यमातून सहकाराबरोबरच शेतीशी संबंधित विविध विषयांची माहिती सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यात येत होती. शेतकऱ्यांना शेती संदर्भातील विविध विषयांची माहिती उपलब्ध करून देण्यासाठी याच वर्षी सहकार खात्याने ‘कृषी दिनदर्शिका’

प्रकाशित केली. याबरोबरच सातत्याने सहकार प्रसारासाठीची पत्रके वेळोवेळी मोफत वाटली जात. संस्थानातील सर्वसामान्य जनतेमध्ये सहकारविषयक जागृतीसाठी बडोदा शासनाकडून करण्यात आलेले गुणात्मक प्रयत्न ही इतर संस्थानांच्या तुलनेत बडोद्याचे ठळक वैशिष्ट्य ठरते.

वरील तुलनात्मक आढाव्यातून एक बाब स्पष्ट होते की बडोदा प्रत्येक आघाडीवर उर्वरित भारताच्या पुढे होता. बडोद्यात लोकसंख्येच्या तुलनेत प्राथमिक सहकारी संस्थांची संख्या उर्वरित भारताच्या तुलनेत सर्वाधिक होती. सहकारी संस्थांचा मुख्य उद्देश सभासदांना कर्जपुरवठा करणे हा असतो. यामध्ये उर्वरित भारताच्या तुलनेत प्रतिसभासद सर्वाधिक कर्जपुरवठा बडोद्यात केला जात होता. प्रत्येक सभासदामागील खेळत्या भांडवलाचे प्रमाण मुंबई प्रांतानंतर बडोद्याचे सर्वाधिक होते. सहकारी संस्थांच्या भांडवल उभारणीतील शासनाच्या सहभागाचा विचार करता बडोदा संस्थानचा सहभाग उर्वरित भारताच्या तुलनेत सर्वाधिक होता. सहकारी संस्थांकडून आकारल्या जाणाऱ्या व्याजाचा विचार करता संपूर्ण भारतात सर्वात कमी व्याजदराने सभासदांना कर्ज उपलब्ध करून देण्याचा मानही बडोद्याला जातो. सहकार चळवळीबाबतची प्रकाशने आणि प्रशिक्षणाचा विचार करता बडोदा संस्था याबाबतही अग्रेसर होते. सहकार प्रकाशने व प्रशिक्षणाचे काम संस्थानच्या प्रशासनाकडून होत होते. इतर ठिकाणी ते बिगर शासकीय यंत्रणेकडून होत होते.

## बडोदा संस्थानातील सहकारी संस्थांचे प्रकार

सयाजीरावांच्या सहकार चळवळीची प्रेरणा ही युरोपातील डेन्मार्क, जर्मनी, हॉलंड, इटली या देशातील सहकार चळवळीची होती. सयाजीरावांचे ठाम मत होते की सामाजिक व आर्थिक सुधारणा ग्रामीण भागातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत जर पोहोचविण्यासाठी सहकारी चळवळीचे माध्यम सर्वात प्रभावी आहे. यासाठीच सयाजीरावांनी पुढील विविध प्रकारच्या सहकारी संस्था बडोदा संस्थानात सुरू आणि त्या उत्तमप्रकारे चालविल्यादेखील.

१) अन्योन्य सहकारी मंडळी
२) बँकिंग संघटना
३) पशुखाद्य साठवणूक संस्था,
४) धान्य साठवणूक संस्था
५) नागरी संस्था
६) विणकर संस्था
७) चर्मकार संस्था
८) अंत्योज संस्था
९) भंगी सहकारी संस्था
१०) नाभिक पतपुरवठा संस्था
११) सरकारी कर्मचारी संस्था
१२) न्यायिक विभाग कर्मचारी संस्था
१३) शिक्षक सहकारी पतपुरवठा संस्था

१४) रेल्वे कर्मचारी सहकारी संस्था
१५) पुस्तकालय साहाय्यक सहकारी मंडळी
१६) महिला काटकसर संस्था (बचत गट)
१७) पुरुष काटकसर संस्था (बचत गट)
१८) आदिवासी महिला काटकसर संस्था
१९) विद्यार्थी सहकारी भांडारे
२०) शहरी सहकारी भांडारे
२१) ग्रामीण सहकारी भांडारे
२२) मोहमेडन सहकारी संस्था
२३) पाटीदार सहकारी संस्था
२४) समाज सुधार संस्था
२५) दुभत्या जनावरांसाठी संस्था
२६) भू-तारण बँका
२७) साकारी ठेकेदार संघटना
२८) निरीक्षक सहकारी संघटना
२९) सहकारी पतपुरवठा संस्था
३०) सहकारी सूतगिरण्या
३१) मध्यवर्ती विमा संस्था
३२) गणदेवी सहकारी ऊस उत्पादक संस्था
३३) सहकारी वीजपुरवठा संस्था
३४) तत्त्वावर कर्ज पुरवठ्यासाठी संस्था
३५) ग्रामीण पुनर्बांधणी संस्था

३६) तालुका विकास संस्था
३७) बी.डी. ८ कापूस संघटना
३८) प्राथमिक शिक्षण संस्था
३९) नागरी बँका
४०) पूर निवारण संस्था
४१) परस्पर सहकार्य संस्था
४२) ग्रामीण पुर्नरचना आणि विकास संघटना
४३) सहकार प्रशिक्षण संस्था
४४) भुईमूग विक्री सहकारी संस्था
४५) कापूस विक्री संस्था
४६) चारा पुरवठा संस्था
४७) दूध व तूप पुरवठा
४८) तांदूळ आणि कडधान्य गिरणी संस्था
४९) पशुसंवर्धन संस्था
५०) ग्रंथ संपादक व ग्रंथ प्रकाशक मंडळी
५१) श्री सयाजी सहकार सेवक संघ
५२) पर्यवेक्षण संघटना
५३) विखुरलेल्या शेतजमिनीचे एकत्रीकरण संस्था
५४) पॉवर पंप संस्था
५५) सहकारी जिनिंग संस्था
५६) आरोग्यविषयक संस्था
५७) सहकारी गृहनिर्माण संस्था

५८) सुधारित अवजारांचा पुरवठा करणाऱ्या संस्था

बडोद्यात एकूण नावीन्यपूर्ण अशा वरील ५८ प्रकारच्या सहकारी संस्था कार्यरत होत्या. सहकारचा असा व्यापक विकास त्या काळात ब्रिटिश प्रांत, संस्थानेच काय तर स्वातंत्र्यानंतरच्या भारतात आजही झाल्याचे आढळत नाही.

## बडोदा सहकाराचा सयाजीमार्ग

१८८५ मध्ये बडोदा संस्थानातील गणदेवी येथे आशियातील पहिला सहकारी साखर कारखाना स्थापन केला. १९०४ चा ब्रिटिश सहकार कायदा पास होण्यापूर्वी बडोद्यात १८८९ साली प्रा.विठ्ठल लक्ष्मण कवठेकर यांच्या प्रयत्नाने 'अन्योन्य सहकारी मंडळीच्या' रूपाने भारतातील पहिली सहकारी बँक स्थापन झाली होती. १९०५ साली ब्रिटिश भारत सरकारच्या धर्तीवर बडोद्यामध्ये सयाजीरावांनी सहकार कायदा मंजूर केला.

महाराजांनी अमेरिकन अर्थतज्ज्ञ व्हाईटनॅक यांच्या मार्गदर्शनाखाली १९०८ साली बडोदा बँकेची स्थापना केली. संपूर्ण भारतात शेतकऱ्यांना सर्वात कमी व्याजदराने कर्ज पुरवठा करण्याची व्यवस्था केली. १९०८ मध्ये सयाजीरावांनी स्थापन केलेली ही भारतीय संस्थानातील पहिली सहकारी बँक आज ११२ वर्षानंतरही अत्यंत कार्यक्षमपणे कार्यरत आहे. समकालीन भारतातील 'स्टेट बँक ऑफ इंडिया'च्या नंतरची दुसऱ्या क्रमांकाची बँक म्हणून ती नावारूपास आली आहे. बडोद्यातील सहकारी संस्थांचे जाळे पसरविताना महाराजांनी विकेंद्रीकरणावर विशेष भर दिला.

विविध प्रकारच्या एकूण ५८ सहकारी संस्था महाराजांनी बडोदा संस्थानात ९० वर्षांपूर्वी यशस्वीपणे कार्यरत केल्या. १९२७ मध्ये बडोदा संस्थानात आलेल्या महापुरात हानी झालेल्या जनतेच्या घरांची पुनर्बांधणी व इतर मदतीसाठी पूर निवारण संस्थेची सहकारी तत्त्वावर बडोदा शहरात सुरुवात केली.

१९३१ साली महिलांच्या काटकसर संस्थांची निर्मिती सयाजीरावांनी केली. महिलांप्रमाणे पुरुषांच्याही काटकसर संस्था (बचत गट) सुरू करून सयाजीरावांनी आदर्श निर्माण केला. बांग्लादेशातील अर्थशास्त्रज्ञ आणि बचत गट चळवळीच्या कामाची दाखल घेऊन २००६ मध्ये ज्यांना नोबेल पुरस्कार दिला गेला त्या महंमद युनूस यांच्या अगोदर ५० वर्षे सयाजीरावांनी बडोद्यात हा यशस्वी प्रयोग केला होता.

भारतातील बचत गट चळवळीचे जनक महाराजा सयाजीराव गायकवाड होते. सहकार चळवळीचा आरंभ केल्यापासून ते महाराजांच्या मृत्यूपर्यंत ३० वर्षांत बडोद्यात सहकारी संस्थांची वाढ १८ ते २० पट झाली तर लोकांचा सहभाग ४५ ते ४७ पट वाढला हा भारतातील आजअखेरचा विक्रम आहे. सहकार चळवळीचे ‘ग्रामजीवन’ हे त्रैमासिक मुखपत्र मराठी व गुजराथी अशा दोन्ही भाषेत निघत असे. ग्रामजीवन हे मराठीतील सहकारविषयक पहिले मासिक आहे.

१९२०-२१ मध्ये कोल्हापूर संस्थानात ३७ सहकारी संस्था होत्या तर त्याचवर्षी बडोद्यातील सहकारी संस्थांची संख्या ५०९ इतकी होती. म्हणजेच कोल्हापूर संस्थानच्या १४ पट सहकारी संस्था बडोद्यात होत्या. १९२७-२८ मध्ये सहकार खात्याकडून 'शेती आणि सहकार' नावाचे दुसरे त्रैमासिक सुरू केले. सहकार प्रशिक्षणाबरोबर सहकार परिषदा हा बडोदा संस्थानचा सहकार साक्षरतेचा नियमित उपक्रम होता. शेतकऱ्यांना शेती संदर्भातील विविध विषयांची माहिती उपलब्ध करून देण्यासाठी सहकार खात्याने 'कृषी दिनदर्शिका' प्रकाशित केली.

भांडवल उपलब्धीबाबत बडोदा भारतात प्रथम क्रमांकावर होते. दर १,००० लोकसंख्येमागे बडोद्यात ४३.३ सहकारी संस्था होत्या. हे प्रमाण ब्रिटिश भारत आणि इतर संस्थानांच्या जवळजवळ दुप्पट होते. सभासदांना कर्ज उपलब्ध करून देण्याबाबत बडोदा तत्कालीन भारतात प्रथम क्रमांकावर होते. बडोद्यातील कृषी सहकारी संस्थांचे कर्ज वाटप सरासरी १०८ रु. प्रतिसभासद इतके होते. हे तत्कालीन भारतातील सर्वाधिक आहे. मुस्लिम, अंत्योज, चर्मकार, ब्राह्मण, भंगी अशा जाती-धर्माच्या सहकारी संस्थांचे जाळे सर्वदूर पसरणारे सयाजीराव भारतात पहिले ठरतात. सर्व जातीधर्म, आदिवासी पासून ते सर्व व्यवसायांना त्यांनी सहकार चळवळीच्या कक्षेत आणले.

सहकारचा असा व्यापक विकास त्या काळात ब्रिटिश प्रांत, संस्थानेच काय तर स्वातंत्र्यानंतरच्या भारतात आजही झाल्याचे आढळत नाही. सयाजीरावांचे सहकार धोरण जर देशातील आजच्या राज्यकर्त्यांनी स्वीकारले तर समाजातील आर्थिक विषमता मिटविण्यात फार मदत होईल. त्यांचे सहकार धोरण मूलत: समाजातील शेवटच्या घटकाच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीचे होते. पर्यायाने संपूर्ण समाजाच्या समतोल विकासाचे सुद्धा होते.

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
 - धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
 - धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
 - सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
 - दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
 - डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
 - सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
 - पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
 - बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
 - बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

# महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



**❒ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**मराठी :**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**English**

- Specchess & Adresses : 2 Books
- Letters : 4 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- Administration : 1 Books
- World Tour Reports : 3 Books
- Education Reforms : 3 Books
- Biographies : 5 Books
- Total English Books : 20

**हिन्दी :**

- सयाजीराव का लेखन : १
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- सयाजीराव जीवनी : २
- भाषण संग्रह : २
- पत्र संग्रह : ३
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद

कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाली आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com